# नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६ मधील नि.क्र. ८१ वरील आदेश

(CNR NO. MHRG140005382016)

१. सदरचा अर्ज अर्जदार यांनी त्यास मयत वादी क्र. २. रवी काशिनाथ गावंड यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे देवून सक्त हरकत घेतलेली आहेत. तसेच प्रतिवादी यांनी सदर अर्जात विलबांचे कारण नमुद केले नसल्याने सदरचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील वादी क्र. २ रवी काशिनाथ गावंड हे २१.१०.२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे वारसांनी अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. परंतु, अर्जदारांना वादी क्र. २ यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी कोरोनाच्या साथीमुळे अर्ज दाखल करणेस ७२७ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे मयत वादी क्र. २ यांचे वारसांना दाव्यात हजर होवून त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता वादी क्र. २ यांचे वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक होईल. परंतु अर्जदार सदरचा अर्ज हा विलंबाने दाखल केल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता अर्जदार यांना खर्च लावून अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्जदार यांचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | अर्जदार यांनी खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना पुढील तारखेपर्यंत द्यावी. |

ठिकाण – उरण (एन.एम.वाली)

दिनांक – १३.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.

## नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६ मधील नि.क्र. ८३ वरील आदेश

(CNR NO. MHRG140005382016)

१. सदरचा अर्ज अर्जदार यांनी २. रवी काशिनाथ गावंड यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी सदर अर्जावर सक्त हरकत घेवून वादीने विलंबाचे योय कारण दिले नाही तरी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. २. रवी काशिनाथ गावंड हे दिनांक २१.१०.२०२० रोजी मयत झाले आहेत. परंतु अर्जदार यांना वादी क्र. २ यांच्या मृत्युचा दाखला वेळेत उपलब्ध न झाल्याने वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झालेला आहे. मयत वादी क्र. २ यांचे वारसांना दाव्यात हजर होवून त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता वादी क्र. २ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करुन त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज रद्द करणे योग्य व संयुक्तिक आहे. परंतु वादीने सदरचा अर्ज हा ब–याच विलंबाने दाखल केल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता वादीस खर्च लावून अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | वादीचा अर्ज रक्कम रु.२५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना दयावी. |

ठिकाण – उरण
दिनांक – १३.०६.२०२३

(निलेश म. वाली)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६ मधील नि.क्र. ८५ वरील आदेश</u>

(CNR NO. MHRG140005382016)

१. सदरचा अर्ज अर्जदार यांनी वादी क्र. २. रवी काशिनाथ गावंड यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी सक्त हरकत घेतलेली आहे. सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील वादी क्र. २. रवी काशिनाथ गावंड हे दिनांक २१.१०.२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. मयत वादी क्र. २. रवी काशिनाथ गावंड यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. सदरचा दावा ठरावाकरीता, अतिक्रमण दूर करुन अतिक्रमित जागेचा खुला ताबा मिळणेकरीता व निरतंर व तुर्तातुर्त ताकीदीकरीता दाखल केला आहे. परंतु अर्जदारांनी सदरचा अर्ज हा ब–याच विलंबाने दाखल केल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता अर्जदार खर्च लावून अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्जदार यांचा अर्ज रक्कम रुपये २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम प्रतिवादीला देवून दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ३. | अर्जदार यांनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

ठिकाण – उरण (एन.एम.वाली)

दिनांक – १३.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.